आजचा दिनविशेष
१६७७ : शिवाजी महाराजांनी तामिळनाडूतील विरुधाचलम येथे देवदर्शनाला भेट दिली. तेथे त्यांनी डच प्रतिनिधींशी चर्चा केली

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार २ ऑगस्ट २०२५ | अंक २२४ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



SUN Tourism INTERNATIONAL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555


# चंद्रकांतदादा दादागिरी करत नाहीत म्हणजे मी दादागिरी करतो का?
# अजित पवारांचा थेट देवेंद्र फडणवीसांना सवाल

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यंदाचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुण्यात झालेल्या या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. यावेळी सर्वच नेत्यांनी गडकरींच्या कामाचे कौतुक केले. या वेळी भाषण करताना अनेक नेत्यांनी मिश्किल टोलेबाजीही केली. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. चंद्रकांत दादा दादागिरी करत नाहीत – फडणवीस पुण्यातील या खास कार्यक्रमात आपल्या भाषणात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, 'पुण्यात दोन दादा आहेत. एक दादा म्हणजे अजित दादा आणि दुसरे म्हणजे चंद्रकांत दादा. पुण्यातील दुसरे दादा जे कधीही दादागिरी करत नाहीत. काही लोक दादागिरी करत नाहीत परंतु त्यांच्या व्यक्तिमत्वातून दिसते' असं विधान केलं आहे.मी दादागिरी करतो का? – अजितदादांचा सवाल यानंतर भाषण करताना अजित पवार यांनीही यावर भाष्य केले आहे. चंद्रकांतदादा दादागिरी करत नाहीत. म्हणजे मी दादागिरी करतो का? असा सवाल अजित पवारांनी फडणवीसांना केला. त्यामुळे कार्यक्रमात एकच



हशा पिकला. तसेच पुढे बोलताना अजित पवारांनी चंद्रकांत दादांना लोक अजूनही पुणेकर मानत नाहीत असंही अजित पवारांनी म्हटलं.गडकरींची एक आठवण सांगताना फडणवीस म्हणाले की, 'पुणे मुंबई हायवे साठी 3600 कोटी रुपयांचा टेंडर रिलायन्सने भरलं होतं. नितीन गडकरींना ते जास्त वाटलं सतराशे अठराशे कोटीत काम होऊ शकते असं त्यांना वाटलं, म्हणून त्यांनी ठरवलं की मी हे टेंडर देणार नाही. धीरूभाई अंबानी खूप मोठे उद्योजक होते त्यांनी जेवणासाठी निमंत्रित केलं आणि त्यांनी सांगितलं की, जे तुम्ही काम करू शकणार नाही हे सरकार काम करू शकणार नाही हे काम कठीण आहे

## नितीन गडकरींचे कौतुक

नितीन गडकरींचे कौतुक करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, देशातील अतिशय प्रतिष्ठित मानला जाणारा हा पुरस्कार आज नितीन गडकरी यांना मिळत आहे. नितीन गडकरींनी अनेक प्रयोग केले अनेक प्रयोग अंगावर आले अनेकदा कर्जबाजारी झाले पण ते कधीच निराश झाले नाहीत. कितीही कठीण प्रसंग जरी आला तरी त्या प्रसंगावर मात करण्यासाठी धैयर्याने सामोरे जायचं हा त्यांच्यातील महत्त्वाचा गुण आहे.

## अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त डॉ.क्षीरसागर दांपत्याकडून अभिवादन





बीड (प्रतिनिधी)दि.१ : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शहरातील विविध कार्यक्रमास उपस्थित राहून डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी अभिवादन केले. शहरातील अर्धाकृती पुतळ्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुष्पहार अर्पण अभिवादन केले. यावेळी नगरसेवक गणेश वाघमारे, विनोद हातागळे, गोपाळ धांडे, अमोल पौळ, स्वप्नील हातागळे, प्रकाश कानगावकर, अमर विद्यागार, नाना मस्के, संगीताताई वाघमारे, मुन्ना गायकवाड, संजय वाघमारे, पांडुरंग सुतार, विशाल मोरे आदी उपस्थित होते. तसेच, कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी शहरातील रामतीर्थ परिसरातील अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी गोरख मोमीन, विशाल बोबडे, सागर पाटोळे, निलेश लोंढे, नितीन आरे, विजय रोकडे, अशोक धुताडमाल, संगीता बाबरे, संजीवणी कानडे, संगीता कांबळे यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती.

## आम आदमी पार्टीच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



बीड बीड जगाला शिकवण देणारे पृथ्वी ही शेषनागाच्या पानावर तरत नसून कष्टकऱ्यांच्या कामगारांच्या व शेतकऱ्यांच्या कष्टाण्यावर तरते अशी ही जगाला शिकवण देणारे साहित्यरत्न मा.आण्णा भाऊ साठे यांना आम आदमी पार्टीच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे जिल्हा कोषाध्यक्ष कैलास चंद पालीवाल जिल्हा बॉडी सदस्य ज्ञानेश्वर माऊली शिंदे शहर अध्यक्ष सय्यद सादेक तालुका अध्यक्ष कृष्णा पंडित कृष्णा जगताप शहर सचिव मिलिंद पाळणे इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते



साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी अभिवादन केले, मीराताई नवले सोबत रवी वाघमारे, नवनाथ प्रभाळे, राजाभाऊ हुरकुडे सह आदी.

## जनता च्या माजी विद्यार्थ्यांचा अनोखा गेट टुगेदर : ३३ वर्षांनंतर अविस्मरणीय सोनेरी आठवणींना उजाळा !

कडा (प्रतिनिधी - रहेमान सय्यद) आष्टी तालुक्यातील धानोरा येथील जनता विद्यालयाच्या १९९२-९३ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा अविस्मरणीय स्नेह मिलन सोहळा अर्थात गेट टुगेदर नगरच्या आनंदबन वॉटर पार्कमध्ये जल्लोषात साजरा करण्यात आला .कालप्रवाहात हरवलेली मित्रमैत्रिणीची साथ, गालातल्या हसण्यांनी भरलेले आठवणींचे क्षण, आणि त्या निरागस बालपणाचा सोनेरी सुवास — हे सगळं पुन्हा अनुभवायची दुर्मिळ संधी नुकतीच लाभली.धानोरा येथील जनता विद्यालयाच्या १९९२-९३च्या इयत्ता दहावीच्या बॅचने तब्बल ३३ वर्षांनी एकत्र येत आपल्या जुने दिन पुन्हा उजाळले. रविवार दिनांक २७ जुलै रोजी आनंदबन वॉटर पार्क, या निसर्गरम्य ठिकाणी आयोजित करण्यात आलेला हा गेट टुगेदर, खरं तर आठवणींचा महाउत्सव ठरला. कार्यक्रमाची सुरुवात झाली ती निवेदिका ज्योती गोरे यांच्या बहारदार हृदयस्पर्शी आणि ओघवत्या निवेदनाने. त्यांच्या शब्दांच्या सुरेल लयीने सर्व वातावरण मंत्रमुग्ध झाले. जुन्या आठवणी, शालेय खोड्या, गुरुजनांचे संस्कार,आणि मैत्रीची अनमोल नाती,या साऱ्यांनी संपूर्ण कार्यक्रमाला एक भावनिक आणि आनंददायी वळण दिलं.दिवसभर




वॉटर पार्कमधील जलक्रीडा, पूलमध्ये पोहण्याचा अनुभव आणि संगीतात रंगलेली थिरकती पावलं, या साऱ्या गोष्टींनी सहभागींचा उत्साह शिगेला पोहोचवला. सर्वांनी बालपण परत जगल्याचा आनंद ओसंडून वाहत होता. मनोरंजक खेळ, विनोदी प्रसंग, गाण्यांचे जल्लोष, आणि पुन्हा एकदा "आपले" असल्याची भावना, या साऱ्या आठवणींना कॅमेऱ्याने टिपण्याची घाई सर्वत्र दिसत होती. प्रत्येक चेहरा आनंदाने उजळलेला होता. सर्व वर्गमित्र मैत्रिणींसोबत एकत्रित स्नेहभोजनाचा आस्वाद घेताना, प्रत्येकाच्या मनात एकच भावना होती,ही भेट क्षणिक असली, तरी तिचा ठसा आयुष्यभरासाठी अजरामर राहणार...! एकंदरीत हा स्नेह मिलन सोहळा सहभागी झालेल्या सर्वांच्याच आयुष्यातील आनंददायी अविस्मरणीय अनुभव होता जो कायम स्मरणात राहील .




कडा - संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कडा येथील तीन शाळेत शालेय साहित्य वाटप करण्यात आले.यावेळी सर्व जाती धर्माचे समाज बांधव उपस्थित होते.

# परळीत दहशत माजविणारी मोठी टोळी अजूनही सक्रिय: खा.बजरंग सोनवणे

बीड: परळीत महादेव मुंडे यांची हत्या होते परंतु २१ महिन्यात पोलीसांना आरोपी सापडत नाहीत. आरोपी पोलीसांच्या नाकावर टिच्चून परळीत फिरतात. हे कोणाच्या आशीर्वादाने चालते. परळीत ज्याला मारले त्यांच्यावरच खोटे गुन्हे दाखल केले जातात, त्यांनाच जेलमध्ये टाकले जाते. परळीत दहशत माजविणारी अजूनही मोठी टोळी बाहेर सक्रीय असल्याचा आरोप खा.बजरंग सोनवणे यांनी केला. बीड येथे मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत महादेव मुंडे यांच्या कुटूंबियांना न्याय देण्याच्या लढ्याची दिशा ठरविण्यासाठी सर्वधर्मिय बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी आ.संदीप क्षीरसागर, आ.प्रकाश



सोळंके, शिवसेना जिल्हाप्रमूख सचिन मुळूक, अनिल जगताप, बाळा बांगर, कुंडलिक खांडे, संतोष जाधव, हनुमान मुळीक, शेख शफीक, राजाभाऊ फड यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, महाराष्ट्रात जिथे अन्याय होतो, तिथे मनोज जरांगे पाटील आणि जिथे पाटील तिथे आम्ही उभा आहोत. आज महादेव मुंडे यांची पत्नी आपल्या सर्वांची ही बहीण २१ महिन्यापासून न्याय मागत आहे. त्यांच्या मागणीचा कोणी विचारत नाही. आज काही खून समोर आले आहेत. परंतु त्यांच्या मारेकऱ्यांना अटक होत नाही. मग मुख्यमंत्री काय करतात. परळीत तेच मारणार आणि तेच खोटे गुन्हे दाखल करत आहे. यामुळे कोणी तरी समोर येऊन बोलणे आवश्यक आहे. बाळा बांगर यांनी पुढे येऊन मांडणी केली आहे. काल मुख्यमंत्र्यांनी एसआयटी स्थापन केली पण त्याची ऑर्डर येईपर्यंत त्यांचे काही खरे मानू नका. एसआयटीमध्ये पंकज कुमावत आले तर दूध का दूध, पाणी का पाणी होईल. दरम्यान, कालपासून महादेव मुंडे प्रकरणात काही आरोपींना अटक झाल्याचे सांगितले जात आहे. परंतु कोणालाही अजून अटक झाली नाही. पोलीस यंत्रणाच अशी अफवा पसरवित असावी. परळीतील पोलीस गेंड्याचे कातडे पांघरून फिरत आहेत. केवळ पोलीस अधिक्षक आणि जिल्हाधिकारी बदलून चालणार नाही तर खालची यंत्रणा देखील बदलली पाहिजे. आज सुद्धा परळीची टोळी सक्रिय आहे. जेलमध्ये देखील त्यांना सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. बीडचा खासदार म्हणून मी कायम या लढ्यात सोबत आहे. मनोज जरांगे पाटील हे देतील तो आदेश पाळून आम्ही काम करू, असा शब्दही बजरंग सोनवणे यांनी दिला.


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

शनिवार २ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

# महामाया निळवंती




पुस्तकाचे नाव
महामाया निळवंती
लेखक – सुमेध
प्रकाशक – छशु ऐीर ड्ढीलश्रळलरींळेप
पृष्ठे – ३७०
मूल्य – ३५०
मुखपृष्ठ व आतील चित्रे– –
समीक्षक – श्रीमती .जावळे शितल दशरथ

अद्भुत, जादुई आणि थरारक अशी मेटाफिक्शन कादंबरी सुमेध लिखित ममहामाया निळावंतीफ ही एक अत्यंत अद्भुत, जादुई आणि थरारक अशी मेटाफिक्शन कादंबरी आहे. ही कादंबरी वाचकांच्या मनावर एक वेगळाच प्रभाव टाकते.

कादंबरीचे मुख्य विषय आणि वैशिष्ट्ये:

* पार्श्वभूमी: ही कादंबरी १८ पौराणिक पोथ्या, अनेक ऐतिहासिक दस्तऐवज, तांत्रिक आख्यायिका आणि निळावंतीच्या दंतकथांचा सखोल अभ्यास करून लिहिलेली आहे. यामुळे कथेला एक मजबूत ऐतिहासिक आणि पौराणिक आधार मिळतो.
* प्रेमकथा आणि रहस्य: सुमारे ४०० वर्षांपूर्वी सह्याद्रीच्या जंगलात घडलेली बाजिंदा आणि निळावंतीची प्रेमकथा या कादंबरीचा मूळ गाभा आहे. बाजिंदाने आपल्या स्वार्थासाठी निळावंतीचा उपयोग करून घेतला आणि नंतर तिचा खून केला. या खुनाचे रहस्य आणि निळावंतीच्या पुनरुत्थानाचे गूढ कथेला एक थरारक वळण देते.
* असामान्य संकल्पना: एक बाप आपल्या मुलाच्या बर्फात आणि मिठात जतन केलेल्या मृतदेहाला जिवंत करण्यासाठी निळावंतीची पोथी शोधत सह्याद्रीच्या जंगलात येतो, ही संकल्पनाच मुळात वेगळी आणि आकर्षक आहे. त्याला अनपेक्षितरित्या निळावंतीचे अस्तित्व सापडते, हे वाचकांना खिळवून ठेवते.
*ही कादंबरी ममेटाफिक्शनफ प्रकारात मोडते, म्हणजेच ती स्वतः कथेच्या रचनेबद्दल किंवा लेखनाबद्दल भाष्य करते. यामुळे वाचकांना एक अनोखा अनुभव मिळतो आणि विचार करण्यास प्रवृत्त करते.
* रहस्य आणि गूढता: ङ्गतिचा खून कोणी केला होता? खून होऊनही निळावंती जिवंत कशी राहिली?ङ्घ यांसारख्या प्रश्नांची उत्तरे कादंबरीमध्ये जसजशी उलगडत जातात, तसतशी उत्सुकता वाढत जाते.

थोडक्यात, ममहामाया निळावंतीफ ही केवळ एक कादंबरी नसून, ती एक अनुभव आहे. रहस्य, गूढता, ऐतिहासिक संदर्भ आणि काल्पनिक दुनियेची सांगड घालून सुमेध यांनी एक प्रभावी आणि लक्षात राहण्याजोगी कलाकृती निर्माण केली आहे. ज्यांना वेगळ्या धाटणीच्या आणि विचार करायला लावणाऱ्या कथा आवडतात, त्यांच्यासाठी ही कादंबरी नक्कीच एक चांगला पर्याय आहे.

आधारित आहे, जिथे बाजिंदा आणि निळावंती यांच्यातील संबंधांचा केंद्रबिंदू आहे. मात्र, ही कथा साधी नसून, त्यात रहस्यमय आणि गूढ घटनांचा समावेश आहे. बाजिंदाने स्वार्थासाठी निळावंतीचा खून केल्यावर, निळावंती कशी जिवंत राहिली, या प्रश्नाभोवती ही कथा गुंफली आहे.

मुख्य वैशिष्ट्ये


* ऐतिहासिक आणि पौराणिक आधार: ही कादंबरी १८ पौराणिक पोथ्या, ऐतिहासिक दस्तऐवज आणि निळावंतीच्या दंतकथांचा सखोल अभ्यास करून लिहिली आहे. यामुळे कथेला एक मजबूत ऐतिहासिक आणि पौराणिक आधार मिळतो.
* असामान्य संकल्पना: यात एका पित्याची गोष्ट आहे जो आपल्या मुलाला जिवंत करण्यासाठी निळावंतीची पोथी शोधत सह्याद्रीच्या जंगलात येतो. ही अनोखी संकल्पना वाचकांना कथेच्या ओघात खिळवून ठेवते.

ही कादंबरी स्वतः कथेच्या रचनेबद्दल भाष्य करते, ज्यामुळे वाचकाला एक नवीन आणि विचार करायला लावणारा अनुभव मिळतो.

समीक्षक – श्रीमती .जावळे शितल दशरथ
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भूगाव २ (मुलींची)

# साहित्य सम्राटास अभिवादन! साहित्य दिंडी, घोषणांचा गजर,अन् सांस्कृतिक परिवर्तनाची सुरुवात बीडच्या आण्णाभाऊ साठे जयंतीने राज्याला आदर्श घालून दिला






बीड / प्रतिनिधीशहरात साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची 105 वी जयंती शुक्रवार (दि.1)ऑगस्ट रोजी अतिशय उत्स्फूर्तपणे परिवर्तनाने साजरी करण्यात आली. सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने चांदणे वाडा येथून आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यापर्यंत भव्य साहित्य दिंडी काढण्यात आली होती. या दिंडीत महिला आणि पुरुष पांढऱ्या शुभ्र पारंपरिक वेशात सहभागी झाले होते. कर्नाटक राज्यातील पारंपरिक वाद्य वादनाने आणि घोषणांनी संपूर्ण शहराचे लक्ष वेधून घेतले. पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून उपस्थित लाखो जनतेने आण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करत त्यांचे विचार स्मरणात ठेवले.

बीड शहरात सार्वजनिक जयंती उत्सव समितीमार्फत दि.28 जुलै ते 1 ऑगस्ट दरम्यान आण्णाभाऊ साठे यांचे विचार आणि कार्य लोकांपर्यंत पोहोचवणारे विविध सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या संपूर्ण महोत्सवाचे मार्गदर्शक अजिंक्य चांदणे, उत्सव समितीचे अध्यक्ष बळीराम गवते आणि सचिव सुनिल पाटोळे यांनी अत्यंत नियोजनबद्ध आणि प्रेरणादायी आयोजन केले होते.सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून आयोजित अभिवादन कार्यक्रमास मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील, आ.संदिप क्षीरसागर, अनिल जगताप, कल्याण आखाडे, उल्हास गिराम, राजेंद्र मस्के, सचिन मुळूक, फारुख पटेल, जयसिंग चुंगडे, अजय सरवदे, सिध्दार्थ शिनगारे, गोपाळ धांडे, प्रेमलताताई चांदणे, उत्तम पवार, अशोक सोनवणे, सुभाष लोणके, यांच्यासह लाखो जनसमुदाय उसळला होता. दरम्यान सायंकाळी बीड शहरातील विविध जयंती उत्सव समित्यांकडून साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती.

## साहित्य रथातून झळकली...

साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त निघालेल्या साहित्य दिंडीत सजविण्यात आलेल्या साहित्य रथाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. 'फकिरा' कादंबरीसह अण्णाभाऊंच्या अन्य ग्रंथरचनांनी रथाची साहित्यिक ओळख अधोरेखित केली, तर "पृथ्वी ही श्रमिकांच्या हातावर तरलेली आहे" हा संदेश सादरीकरणातून प्रभावीपणे पोहोचवण्यात आला. याचबरोबर कर्नाटक वाद्यांच्या सादरीकरणामुळे या दिंडीला सांस्कृतिक वैशिष्ट्याची लय मिळाली. लोकशाहीर अण्णाभाऊंच्या विचारांची झलक आणि श्रमिकांचे प्रतिनिधित्व करणारी कलात्मक मांडणी ही या रथाची खरी ओळख ठरली.

## मंजुषा शिंदेंच्या सूरांनी जागवली समतेची जाणीव!

आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित संगीत रजनीत ख्यातनाम गायिका मंजुषा शिंदे यांनी आंबेडकरी चळवळीची मूल्यं, समता, बंधुता आणि न्यायाचे गीतरूप सादर केले. त्यांच्या सादरीकरणातून समाज परिवर्तनाचा संदेश जोरकसपणे उमटला. आंबेडकरी सांस्कृतिक आंदोलनाला स्वरांची ताकद लाभली, अशी भावना उपस्थितांमध्ये उमटली.

## संयुक्त महाराष्ट्र चळवळ दिन


साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांचा जन्मदिन संयुक्त महाराष्ट्र चळवळ दिन म्हणून साजरा करावा, यासाठी 15 ऑगस्ट रोजी सकाळी 11 वाजता स्वाक्षरी मोहीम सुरु करुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले जाणार आहे. आशा माहितीचा उपक्रम साहित्यरत्न डॉ.आण्णाभाऊ साठे गौरव समिती महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राबविण्यात येत आहे.

## पाचशे महिलांना साड्या वाटप!

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक समतेचे आणि श्रमिक सन्मानाचे प्रतीक ठरलेल्या या दिवशी, शहरातील कष्टकरी, कामगार महिलांना साडी वाटप करून त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

# येळी घाटावर नांदेड पोलीस, महसूलची संयुक्त कारवाई तब्बल ४ कोटी ७२ लाखांचा मुद्देमाल जप्त


नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : जिल्ह्यात वाळूमाफियांशी पोलिसांनी थेटपणे साधलेले संधान गेल्या चार दिवसापासून उघड होत आहे. नांदेड पोलीस परिक्षेत्राचे उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी हे मधुर संबंध उघड केले असून आता संबंधितांना थेट नियंत्रण कक्षात पाठवले जात आहे. अनेकांची चौकशी सुरू करण्यात आली आहे. ज्या पथकाकडे वाळू उपसा रोखण्याची जबाबदारी दिली होती त्यांनीच वाळूमाफीयांशी हातमिळवणी केल्यामुळे त्या संपूर्ण पथकाला निलंबित करण्याची कारवाईही करण्यात आली आहे. कारवाईचा हा धडाका पाहता अखेर लोहा तालुक्यातील येळी घाटावर पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी तसेच लोहा तहसीलचे महसूल अधिकारी गुरुवारी सकाळीच पोहोचले. त्यांनी केलेल्या कारवाईत तब्बल ४ कोटी ७२ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. लोहा तालुक्यातील येळी घाटावर गेल्या वर्षभरापासून दिवस रात्र खुलेआम वाळू उपसा सुरू असताना कारवाईची धमक मात्र दाखवली जात नव्हती. एक कारवाई स्थानिक गुन्हा शाखेने केली होती; मात्र ती कारवाईही वादग्रस्तच ठरली होती. त्याकारवाईनंतर दोन दिवसातच त्या ठिकाणचा वाळू उपसा पुन्हा सुरू झाला होता. तो दिवस रात्र सुरूच होता. यासाठी मोठमोठ्या बोटींचा वापर केला जात




होता. अनेक माध्यमांनी याकडे वरिष्ठांचे लक्ष वेधूनही कारवाई मात्र शून्य होती. राजकीय हस्तक्षेपामुळे ही कारवाई केली जात नव्हती असेही स्पष्टपणे सांगितले जात होते. अखेर पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी सुरू केलेल्या बदली सत्रानंतर मात्र पोलीस आणि महसूल विभागही खडबडून जागा झाला. भनगी, लिंबगाव पाठोपाठ बहुचर्चित येळी घाटावरही कारवाई करण्यात आली आहे. महसूल दिनाच्या पूर्वसंध्येलाच झालेल्या या कारवाईत पोलिसांनी पाच जणांविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्यामध्ये संभाजी प्रभाकर सोमवारे रा. येळी, व्यंकटी आनंदराव ढगे, संदीप रामराव ढेपे रा. मारतळा, ओमप्रकाश एकनाथ जाधव रा. चिंचोली आणि गजानन सुदाम हावणे रा. कौडगाव यांच्याविरुद्ध उस्माननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पोलिस आणि महसूल विभागाच्या या संयुक्त कारवाईत गुरुवारी साडेतीन कोटी रुपयांच्या ७ जेसीबी मशीन पकडण्यात आल्या आहेत. त्यासोबतच चार मोठ्या फायबर बोट ज्यांची किंमत ६९ लाख रुपये आहे. साठ लाखांच्या सहा छोट्या इंजिन बोटही या कारवाईत पकडण्यात आले असून पन्नास ब्रास रेती जप्त करण्यात आली आहे. या कारवाईत तब्बल ४ कोटी ७२ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. कंधारच्या उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप यांच्यासह लोह्याचे तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपस्थितीत गुरुवारी सकाळी सात वाजताच संयुक्त पथक येळी घाटावर दाखल झाले. येळीसह कौडगाव येथेही पोलिसांनी कारवाई केली. तेथे अवैधरित्या वाळू उपसा सुरू होता. पोलिसांना पाहताच वाळू उपसा करणारे गोदावरी नदीत उड्या मारून पळून गेले. सदर ठिकाणी ७जेसीबी, ४ फायबर बोटी, ६ इंजिन बोट तसेच ५० ब्रास वाळू असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत उस्माननगर ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार, उपनिरीक्षक गजानन गाडेकर, संजय मुंडे, पोहेकॉ गंगाधर चिंचोरे, निलप्पा पवार, मधुकर पवार, सुशील कुबडे,श्याम वडजे, पोकॉ प्रकाश पेदेवाड, माधव पवार, तुकाराम पवार, राठोड यांचा समावेश होता.

# लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त अभिवादन







नवीन माध्यमिक विद्यालय, पारंबी तालुका मुक्ताईनगर जळगाव येथे नुकतेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष व विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री संतोष पाचपोळ सर होते याप्रसंगी त्यांनी या महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार करून वंदन केले याप्रसंगी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक डॉ.शिवचरण उज्जैनकर यांनी व श्री रोहन आठवले यांनी सुद्धा महामानवांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून वंदन केले याप्रसंगी या कार्यक्रमाचे सूत्र संचालन इयत्ता दहावीचा विद्यार्थी तुषार बडगे यांनी केले याप्रसंगी इयत्ता आठवी नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले प्रसंगी ज्येष्ठ शिक्षक डॉ. शिवचरण उज्जैनकर यांनी लोकमान्य टिळक यांच्या विषयी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये लोकांना जागृत करण्यासाठी व इंग्रजांविरुद्ध बंड करण्यासाठी लोकमान्य टिळक यांनी फार मोठी भूमिका बजावली आहे त्यांनी केसरी व मराठा या वर्तमानपत्रांमधून समाजाला जागृत करण्याचे कार्य केले व स्वातंत्र्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य देशासाठी अर्पण केले तसेच अकोला येथील शिवजयंती व गणेश उत्सवा निमित्त आयोजित व्याख्यानासाठी लोकमान्य टिळकांना आमंत्रित करण्यात आले होते याप्रसंगी स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आशीर्वाद महत्त्वाचे आहे आणि म्हणून आपले शेगाव येथील संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज यांना सुद्धा याप्रसंगी सन्मानाने आमंत्रित करण्यात आले लोकमान्य टिळक आणि संत गजानन महाराज एकाच व्यासपीठावर होते ही सुद्धा फार मोठी उपलब्धी म्हणावी लागेल. लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या तुरुंगात गीता रहस्य हा एक पवित्र ग्रंथ त्यांनी लिहिला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे सुद्धा कार्य साहित्य क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणावर आहे त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये लोकमान्य टिळकांसारखेच समाज जागृतीचे कार्य आपल्या लोकगीत, पोवाडे,तमाशे व नाटकांच्या माध्यमातून केली ते रशियामध्ये सुद्धा प्रसिद्ध होते साधी राहणी व उच्च विचारसरणीचे अण्णाभाऊ साठे यांनी आपल्याला त्यांच्या साहित्यामधून खूप मोठी देणगी दिलेली आहे या दोघेही महामानवांचे विचार आपण आपल्या जीवनामध्ये आणून आपल्या सोबत समाजाचे सुद्धा जीवन प्रेरणादायी करावे असा सुद्धा सल्ला आपल्या मार्गदर्शनात डॉ.उज्जैनकर यांनी दिला.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## बानेश्वर विद्यालय बाणेगाव येथे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी



दिनांक एक ऑगस्ट रोजी बानेश्वर विद्यालय बाणेगाव येथे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली .याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कु भक्ती उढाण व कु.अंजुम पठाण यांनी केले कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व आपले विचार मांडले कु.गंगासागर उढाण, अनंत उढाण, वैभव उढाण कु.कल्याणी चव्हाण, कु.प्रणिता उढाण कु.अरिबा पठाण कु.श्रद्धा कदम कु. तेजस्विनी कदम ,कृष्णा काचकडे कु.मोनिका केंद्रे कु. मोक्षदा उढाण कु.दुर्गा उढाण यांनी आपले विचार मांडले कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री जि.एस.चव्हाण सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री मंडलिक सर यांनी अध्यक्षीय भाषण केले या कार्यक्रमास श्री राठोड सर श्री मोहिते सर श्री गायके सर श्री काकडे सर श्री वडतकर सर श्री राऊत सर श्री वाबळे सर श्री डी के खरात सर श्री यांची उपस्थिति होती कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु.शिवकन्या लाड हिने केले.








साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या 105 व्या जयंती निमित्ताने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक बीड शहर या ठिकाणी जाऊन अभिवादन केले व भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय या ठिकाणी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे सर्व जिल्हा व शहर पदाधिकारी कार्यकर्ते

### बीड नगर परिषदेतील स्वच्छतेत तीन तेरा लवकरात लवकर स्वच्छता करा व्यापारी आक्रमक

# बीड नगर परिषद मुख्य अधिकारी यांना निवेदन

बीड प्रतिनिधी नगर परिषद हद्दितील आठवडी बाजार भाग, मोमीनपूरा मुख्य रस्ता, नवीन भाजी मंडई परिसर, राजीवगांधी चौक परिसर, नगर नाका मच्छि मार्केट परिसर व पालवन चौक मधील परिसर व्यापारी वर्गा करिता स्वच्छ करा

आम्ही बीड नगर परिषद हद्दीतील दैनंदिन व आठवडी बाजार मधील व्यापारी असून आमच्याकडून ठेकेदार मार्फत कर म्हणून 10 व 20 रुपये प्रमाणे घेतले जात असून ते आम्ही देत आहोत. आमचेकडुन कर घेतले जात असतांना आम्ही ज्या जागी आठवडी बाजार, नवीन भाजी मंडई, पालवन चौक, मोमीनपुरा या भागामध्ये बसतो त्याजागी आपले कार्यालयच्या स्वच्छता कर्मचाऱ्याकडुन स्वच्छता केली जात नसल्यामुळे आम्हाला घाणीवर बसून आमचा व्यापार करावा लागत



आहे घाणीच्या दुर्गंधीमुळे आम्हाला रोगराईचा धोका निर्माण होत असून भाजी पाला व फळे वर गंभीर स्वरुपाचे जंतू बसत असल्यामुळे आमचे भाजी पाल्यामुळे व फळामुळे जनतेचे आरोग्य पण धोक्यात आले आहे. इतर मागण्यांसाठी बीड नगरपरिषद येथील व्यापारी आक्रमक होऊन मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले निवेदनात म्हटले आहे की व्यापारी म्हंटले आहे कीआमचे आठवडी बाजार दर रविवारी सकाळी पुर्ण पणे स्वच्छ करुन दयावे व आठवडी बाजारामधील मोकाट जनावरे कोंडवाडयामध्ये टाकावे कारण की मोकाट जनावरामुळे बाजारामध्ये चोही कडे शेन पसरलेले दिसत आहे तसेच भाजी मार्केट आतमधील घाण आठवडयात तोन वेळेस करुन दयावे. आपल्या कर्माचाऱ्यांना वेळोवेळी सांगूनही ते पूर्णपणे परिसर स्वच्छ न करता निघून जाते. आठवडी बाजार परिसरमध्ये घाण असल्या कारणाने दाने शे ते तीन शे भाजी पाला विक्रेते सुभाष रोड वर बसून व्यवसाय करीत असल्यामुळे नागरीकांना येणे जाणे साठी रहदारीस अडथळा होत आहे. मुख्याधिकारी यांनी आमचे मागण्या मान्य करावे नसता आम्ही नाइलाजास्तव आपल्या कार्यालयासमोर येणाऱ्या काळात उपोषणाला बसेल अशी आक्रमक भूमिका घेतली त्यावेळी

# वैद्यनाथ बँक संचालक मंडळ निवडणूक - 2025

## महाविकास आघाडी प्रणित वैद्यनाथ परिवर्तन पॅनलचा शनिवारी प्रचार शुभारंभ

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) महाराष्ट्रात नामांकित अर्थसंस्था म्हणून नावाजल्या जाणाऱ्या वैद्यनाथ सहकारी बँकेच्या संचालक मंडळाचा निवडणूक कार्यक्रम सुरू आहे. महायुतीच्या ताब्यातील या संस्थेची निवडणूक सुरुवातीला बिनविरोध होईल असे वाटत असतानाच महाविकास आघाडीकडून तीन उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने एकूण 13 जागांसाठी निवडणूक लागली आहे. आघाडी प्रणित वैद्यनाथ परिवर्तन पॅनलचा प्रचार शुभारंभ शनिवार, दिनांक 02 ऑगस्ट रोजी करण्यात येणार आहे. हनुमान मंदिर, मोंढा मार्केट, परळी वैजनाथ येथे सकाळी ठिक 11 वाजता प्रचार शुभारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पॅनलच्या प्रचार समितीकडून देण्यात आली आहे. याबाबत सविस्तर असे की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते राजेभाऊ श्रीराम



फड, तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे व वैजनाथ धमपलवार या तिघांनी वैद्यनाथ बँक संचालक मंडळ निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र दाखल केले असून वैद्यनाथ परिवर्तन पॅनलची स्थापना करण्यात आली आहे. त्यांच्या प्रचाराचा शनिवार, दिनांक 02 ऑगस्ट रोजी हनुमान मंदिर मोंढा मार्केट येथे सकाळी ठिक 11 वाजता प्रचार शुभारंभ करण्यात येणार आहे. या प्रचार शुभारंभाच्या कार्यक्रमास महाविकास आघाडीतील सर्व घटकपक्षांच्या कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, शहराध्यक्ष ॲड.जिवनराव देशमुख, काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष ॲड.प्रकाश मुंडे, शहराध्यक्ष बहादुरभाई, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉम्रेड पांडुरंग राठोड, शेतकरी कामगार पक्षाचे तालुकाध्यक्ष सुमंत उंबरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक तालुकाध्यक्ष शंकर शेजुळ, शहराध्यक्ष सय्यद फिरोज यांच्यासह महाविकास आघाडीतील सर्व घटकपक्षांच्या नेत्यांनी केले आहे.

### सभासदाच्या सर्वांगीण विकासासाठी निवडणुकीच्या मैदानात - राजेभाऊ फड

वैद्यनाथ सहकारी बँक ही महत्त्वाची आर्थिक संस्था म्हणून नावाजलेली आर्थिक संस्था आहे. सभासदांच्या हितासाठी असलेल्या या आर्थिक संस्थेचा वापर मात्र काही नेत्यांकडून राजकीय स्वार्थासाठी केला जातोय हे दुर्दैव आहे. हजारो सभासद बँकेसोबत जोडले गेलेले असताना त्यांच्या हिताचा विचार मात्र कोणीच करतांना दिसत नाही. हे चित्र आता बदलावे लागणार असून, सभासदांचे हित जोपासण्यासाठी संचालक मंडळ निवडणूक आम्ही लढवत आहोत. सभासदांच्या पाठबळावरच आम्ही त्यांच्या हितासाठी संघर्ष करत राहू असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ श्रीराम फड यांनी म्हटले आहे.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती पाटोद्यात मोठ्या उत्साहात साजरा

पाटोदा (गणेश शेवाळे) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त पाटोद्यात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली जयंती निमित्त पाटोदा शहरात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, पदाधिकारी,अनेक मान्यवर आणि समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरलेले रक्तदान शिबिर हे समाजासाठी एक सकारात्मक संदेश देणारे ठरले. या शिबिरात तरुणांनी, महिला-पुरुषांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत



समाजसेवेचे अनोखे उदाहरण घडवले. जमा झालेल्या रक्ताच्या पिशव्या भविष्यात गरजू रुग्णांच्या मदतीस धावून जाणार आहेत. हा उपक्रम आरोग्य संवर्धन व सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव जागवणारा ठरला कार्यक्रमात युवानेते सागर धस यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनचरित्रावर सखोल भाष्य करत उपस्थित तरुण वर्गाला प्रेरणा दिली. त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले की,"अण्णाभाऊ साठे हे



केवळ एक साहित्यिक नव्हते, तर ते एक क्रांतिकारी विचारवंत, लोककवी, आणि वंचित समाजाचे समर्थ प्रवक्ते होते. त्यांनी समाजातील विषमता, अन्याय, शोषण यावर लेखणीच्या माध्यमातून प्रहार करत दलित- वंचितांच्या जिव्हाळ्याचा आवाज निर्माण केला. त्यांच्या विचारांवर चालणं हीच खरी त्यांना श्रद्धांजली आहे." धस यांनी उपस्थित तरुणांना आवाहन करताना सांगितले की, "समाज बदलण्यासाठी संघर्ष करण्याची गरज आहे. अण्णाभाऊंच्या जीवनातून प्रेरणा घेत आपण सामाजिक समतेसाठी, शिक्षणासाठी आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी सज्ज झालं पाहिजे."कार्यक्रमात अनेक मान्यवरांची भाषणे, अनुभव कथन, आणि सामूहिक घोषणांमधून अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची महती सांगण्यात आली. संपूर्ण परिसरात उत्सवमय वातावरण होते आणि नागरिकांमध्ये विशेष उत्साह दिसून आला.कार्यक्रमाची सांगता सामूहिक अभिवादन, रक्तदात्यांचा सत्कार व आभार प्रदर्शनाने करण्यात आली.या अभिवादन सोहळा आणि रक्तदान शिबिराच्या माध्यमातून अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची आठवण तर झालीच, शिवाय समाजसेवेचा एक सशक्त संदेशही पाटोदा परिसरात पोहोचवण्यात आला.

# बंजारा समाजाची परिस्थिती बदलायची असेल तर राजसत्तेत जाण्याची गरज आहे-प्रा.पी टी चव्हाण

धामणगांव ( )आष्टी तालुक्यातील कारखेल बु. या छोट्याशा गावात बंजारा समाजाच्या वतीने जगदंबा देवी व सेवालाल महाराज मुर्ती प्राण प्रतिष्ठेच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त भव्य रोप्यमहोत्सव सोहळा व बंजारा समाजाचा मेळावा आज दिनांक ३१ जूलै रोजी आयोजित करण्यात आला होता..

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राज्यातील बंजारा समाजाचे नेते व भाजपाचे प्रदेश महामंत्री प्रा.पी.टी. चव्हाण पुढे बोलताना म्हणाले की, आज मी इथे नेता म्हणून नाही, तर तुमचाच समाजाचा एक छोटासा कार्यकर्ता म्हणून आलो आहे - जो तुमच्या सुखदुःखात सहभागी आहे,आणि जो तुम्हाला न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने लढतोय. आज समाजामध्ये असमानता, बेरोजगारी,महागाई,शिक्षण व आरोग्याच्या अडचणी, हे प्रश्न डोंगरासारखे उभे आहेत. या सगळ्याचा सामना करण्यासाठी आपल्याला फक्त ओरडून उपयोग नाही -समाजाला न्याय देणारी व समाजाचे प्रलंबित व जिव्हाळ्याचे प्रश्न सोडविण्यासाठी सत्ता हवी



आहे. आणि ती सत्ता आपल्या हातात आली पाहिजे.यासाठी आता आपल्या बंजारा समाजाच्या तरुणांनी आता घरात न बसता सत्ता हाती घेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. आपल्या नव तरुणांना रोजगार मिळवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महायुती सरकारने देखील विविध मंत्र्यांकडून निधी मिळवून दिला पाहिजे.

येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टी सोबतच ज्या ज्या पक्षांमध्ये बंजारा समाजाचे कार्यकर्ते तन मन धनाने काम करत आहेत अशा सर्व राजकीय पक्षाने उमेदवारी देऊन त्यांना निवडून आणून सत्तेच्या खुर्चीवर बसवावे तसेच बंजारा समाजाला राजकीय व सामाजिक न्याय द्यावा,अशी जोरदार मागणी

प्रा.पी.टी.चव्हाण यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना केली.या कार्यक्रमाला गिन्यानदेव महाराज राठोड,माजी सरपंच दत्तू जाधव, बाबुराव जाधव,बाळू राठोड, अशोक जाधव सर, तुकाराम जाधव, शिवराम जाधव, नवनाथ राठोड, साहेबराव जाधव, सिताराम जाधव,रवींद्र चव्हाण, शत्रुघ्नबाप्पू मरकड, सरपंच विकास पवार, किशोर पवार, कौसाबाई जाधव,सविता जाधव,पारूबाई राठोड, सुमनबाई जाधव, जिजाबाई जाधव, लिलाबाई राठोड, आदी सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता. या कार्यक्रमाला प्रवचनकार महंत काशिनाथ शास्त्री महाराज हे देखील उपस्थित होते.

# मोहम्मद रफींच्या सदाबहार गीतांनी रसिक श्रोते मंत्रमुग्ध

## बीडसह जालना जिल्ह्यातून आलेल्या रसिकांनी दालन ओसंडून वाहिले

बीड (प्रतिनिधी) - चित्रपटसृष्टीतील सुरांचे बादशहा-तानसेन म्हणून जगभरात ज्यांचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते, ज्यांच्या गायन कले समोर रसिक श्रोते नतमस्तक होतात, असे दिवंगत पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या ४५ व्या पुण्यतिथी निमित्ताने पीस बुक डेपो कडून संचालक तथा गायक एम.एम.शेख यांनी दरवर्षीप्रमाणे यावेळीही घेतलेल्या एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम या कार्यक्रमात संगीतप्रेमींचा महापूर लोटला. मंत्रमुग्ध झालेल्या रसिक श्रोत्यांनी दालन अक्षरशः ओसंडून वाहिले. बीड शहरात गायक एम.एम.शेख यांनी जिल्हाभरातील इतर गायक-गायिकांना सोबत घेत गायकांचा एक संच तयार केला आहे. हे सर्वजण मिळून अजरामर पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथी निमित्ताने दरवर्षी ३१ जुलै रोजी एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम हा कार्यक्रम विनामूल्य आयोजित करतात. या कार्यक्रमाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. यावेळी तर जालना रोड वरील संग्राम हॉटेल च्या दालनात घेण्यात आलेल्या कार्यक्रमास फक्त बीड शहरच नाही तर जिल्हाभरातून तसेच शेजारील जालना जिल्ह्यातून सुद्धा रसिक श्रोते खास कार्यक्रमासाठी आले होते. दालन अपूरे पडल्याने अनेक रसिक श्रोत्यांना माघारी जावे लागले. एवढी प्रचंड आत्मीयता रफी साहेबांच्या गाण्यांप्रती आजही रसिक




श्रोत्यांमध्ये आहे. याचा पुन्हा एकदा प्रत्यय आला. कार्यक्रमात एम.एम.शेख यांच्यासह ज्येष्ठ संगीत विशारद-गायक शेख मझहरुद्दीन, आकाश जाधव, संध्या जाधव, प्रियंका भंडारी, सय्यद मुजीब, निशा उजगरे, शेख सैलानी, ॲड. वर्षा दळवी, अश्विनी दळवी, ज्येष्ठ गायिका शकुंतला ससाने, शकुंतला खरात, सुप्रसिद्ध दंतचिकित्सक डॉ. साळवे, शेख ज़हीर आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी गाणी सादर केली. रफी साहेबांच्या एकापेक्षा एक अशा रोमँटिक, दर्दी सदाबहार आणि देशप्रेमावरील गाण्यांसह रफी साहेबांच्या नावाने "ना फनकार तुझसा तेरे बाद आया, मोहम्मद रफी तू बहुत याद आया" या गाण्याने रफी साहेबांना श्रद्धांजली वाहण्यात आली. संपूर्ण कार्यक्रमाचे खुमासदार सूत्रसंचालन गायक, निवेदक तथा गीतकार आकाश जाधव यांनी अत्यंत कल्पकतेने केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व रसिक श्रोत्यांसह या कार्यक्रमास वृत्तपत्रातून ठळक प्रसिद्धी दिलेल्या सर्व वृत्तपत्रांचे संपादक व पत्रकारांचे, आयोजक एम.एम.शेख आणि मुक्तपत्रकार एस.एम. युसूफ़ यांनी मनस्वी आभार व्यक्त केले.

# अगस्त्य इंटरनॅशनल फौडेशन आयोजित एविपी कार्यशाळा पिल्लई इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीस अँड रिसर्च कॉलेज रसायनी पनवेल येथे यशस्वीरित्या संपन्न

(दिनांक १ऑगस्ट२०२५ रसायनी ता. खालापूर रायगड) -दिनांक १ आगस्ट २०२५ रोजी अगस्त्य इंटरनॅशनल फाउंडेशन वतीने अगस्त्या वॉलेटरिंग प्रोग्राम (एवीपी)आयोजित मॉडेल मेकिंग कार्यशाळा पिल्लई मॅनेजमेंट कॉलेज रसायनी पनवेल येथे यशस्वीरित्या पार पडली. शिक्षण क्षेत्रामध्ये जर आपल्याला योगदान द्यायचे असेल, आपल्याला शिकवण्याची लहान मुलांशी संवाद साधण्याची आवड असेल यासाठी अगस्त्याच्या वतीने अगस्त्या वॉलेटरिंग प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले आहे.यामुळे अगस्त्याच्या हँडसऑन अध्ययन पद्धतीचा फायदा



जास्तीत जास्त मुलांना होऊ शकतो.याच प्रोग्राम अंतर्गत पिल्लई कॉलेज ऑफ मॅनेजमेंट येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होते यात १२० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.यात विज्ञान व गणित याचे विविध शैक्षणिक साधने बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली.विद्यार्थ्यांनी उत्साहाने या कार्यशाळेमध्ये सहभाग नोंदवला आणि या मोहिमेमध्ये आम्हाला नक्कीच सहभागी व्हायला आवडेल असा अभिप्राय दिला.या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी पिल्लई मॅनेजमेंट कॉलेजचे डायरेक्टर डॉ.केतन वीरा सर,कॉर्डिनेटर शिबा मॅम पिल्लई बी.एड.कॉलेज प्राचार्य ममता मॅडम,विजय मोरे सर उपस्थित होते.तसेच ही कार्यशाळा प्रदीप कासुर्डे सर, एग्रेटर पल्लवी पट्टेबहादूर मॅडम,तृप्ती चोपडे मॅडम यांनी यशस्वीरित्या संचलित केली.तसेच सारथी शशिकांत म्हात्रे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.एवीपी प्रोग्राम साठी डीएड, बीएड, एमएसडबल्यू डिग्री कॉलेज,इंजिनिअरिंग कॉलेज,जर्नलिझम कॉलेज,विद्यार्थी, एनजीवो प्रतिनिधी सहभागी होऊ शकतात.आपल्या कॉलेजमध्ये हा उपक्रम सुरू करायचा असल्यास संपर्क करावा

प्रदीप कासुर्डे सर (एबीपी कॉर्डिनेटर )
महाराष्ट्र १ संपर्क +७७३८४३६४४९

# ताल म्युझिक अकॅडमी अंबरनाथ (पूर्व )

## पद्मश्री मोहम्मद रफी जी यांच्या पुण्यतिथी निमित्त स्वरांजली




ताल म्युझिक अकॅडमी आयोजित श्री. सुनील हिवाळे सर यांच्या संकल्पनेतून मोहम्मद रफी जी यांच्या कार्याला उजाळा मिळण्यासाठी, रफीच्या कार्याची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा कार्यक्रम साकारण्यात आला. या कार्यक्रमामध्ये ताल अकादमीच्या विद्यार्थ्यांनी रफिजीची गाणी गाऊन या कार्यक्रमाची शोभा वाढवली.तसेच ताल म्युझिक अकॅडमी मध्ये सर्व प्रकारचे गायनप्रेमी शिक्षक ,वकील, इंजिनियर, डॉक्टर,सीनियर सिटीजन असे सर्व पेशातील विद्यार्थी श्री सुनील हिवाळे सर यांच्या प्रेरणेतून गायनाचा छंद जोपासत असतात. कार्यक्रमाच्या अंतिम टप्प्यात श्री सुनील सर यांच्या सुमधुर आवाजात कार्यक्रमाची सांगता झाली .येथे सर्व प्रकारच्या गायनाचे व वादनाचेअध्ययन अध्यापन होत असते.

# कोकणदीप मासिकाचा २३वा वर्धापन दिन उत्साहात साजरा!



मुंबई:कोकणदीप मासिकाचा २३ वा वर्धापन दिन मुबंई मराठी ग्रंथ संग्रालय दादर येथे मा.ना.श्री योगेशदादा कदम (राज्यमंत्री गृह (शहरे)यांच्या उपस्थितीत मोठया थाटामाटात संपन्न झाला.यावेळी सामाजिक शैक्षणिक,साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना कोकणदीप पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.तसेच श्री. शशिकांत सावंत(पत्रकार, साहित्यिक),श्री.रविंद्रभाई कालेकर (सदस्य महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ)यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी मंचावर श्री.सुधीरभाऊ कदम(शिवसेना संपर्क प्रमुख -दापोली विधानसभा),डॉ.सुकृत खांडेकर(जेष्ठ पत्रकार,संपादक दैनिक प्रहार),श्री संतोष परब (महाराष्ट्र शासन समाज भूषण पुरस्कार प्राप्त),डॉ.राम मेस्त्री (साहित्यिक),श्री.प्रवीण घाग(गिरणी कामगार नेते),श्री रणजित जाधव,विनय शेडगे आदी मान्यवर उपस्थित होते.तसेच विद्याधर शेडगे,सागर शेडगे,संदीप शेडगे, नितीन सुगदरे, निशांत शेडगे यांनी मेहनत घेतली व सूत्रसंचालन श्री.प्रसाद महाडिक यांनी केले.व आभार प्रदर्शन संपादक श्री दिलीप शेडगे यांनी मानले

# अगस्त्य इंटरनॅशनल फौडेशन अँडोबी डिजिक्षेत्र सेंटर श्री. सनातन धर्म हायस्कूल जी. टी. बी. नगर येथे उत्साहात संपन्न

दिनांक २९ जुलै जी.टी.बी. नगर मुंबई (प्रदीप कासुर्डे) दिनांक २९जुलै २०२५ रोजी श्री.सनातन धर्म हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज जी.टी.बी.नगर येथे अगस्त्या इंटरनॅशनल फाउंडेशन तर्फे अँडोबी डिजिक्षेत्र प्रोग्राम सेंटरचे उदघाटन करण्यात आले.यासाठी विजन फाउंडेशनचे श्री.अनिल गंगाराम विजन सर व शाळेचे मुख्याध्यापक, इन्चार्ज




हिंदी मीडियम ,इंग्लिश मीडियम प्रिन्सिपल व इतर शाळेचे कर्मचारी या सर्वांची उपस्थिती ,त्याचबरोबर अगस्त्या इंटरनॅशनल फाउंडेशनकडून श्री.कौस्तुभ दीक्षित सर व श्रीमती.शुभांगी लोंढे मॅडम यांची उपस्थिती होती.या प्रसंगी विद्यार्थ्यांनी अगस्त्या इंटरनॅशनल फाउंडेशन विषयी माहिती, त्याचबरोबर संगणक आणि संगणकाचे इतर पार्टस त्याचबरोबर रोबोटिक किटस आणि डिवाइस यांची माहिती दिली. डिजिक्षेत्र हा प्रोग्राम आजच्या संगणक युगात विविध कौशल्य विद्यार्थीमध्ये आत्मसात करण्यासाठी अतिशय महत्त्वाचा आहे. यात विविध डिजिटल स्किल्स विद्यार्थ्यांना हँडसऑन पद्धतीने शिकवले जातात.या कार्यक्रमप्रसंगी डिजिक्षेत्र सेंटरचे इंग्रेटर सुयोग पाटील सर तसे एकनाथ लोखंडे सर उपस्थित होते.

# ह भ प संतदास उर्फ श्री पुरुषोत्तम महाराज हिंगणकर यांना सांस्कृतिक वं साहित्य रत्न पुरस्कार २०२५ प्रदान.

ह भ प श्री कवी संतदास उर्फ पुरुषोत्तम महाराज हिंगणकर यांना आम्ही मुंबईकर यां वृत्तपत्र संस्थे द्वारा सांस्कृतिक व साहित्य रत्न पुरस्कार २०२५ रविवार दि २७, जुलै, २०२५ रोजी मोठ्या थाटामाठात शाल ट्रॉफी सह मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला हिंगणकर महाराज एक जेष्ठ समाजसेवक,कीर्तनकार प्रवचनकार तसेच कवी अभंगकार कवी संतदास म्हणून सर्व महाराष्ट्रात त्यांची ख्याती आहे. पुरस्कार प्रदान करतांना आम्ही मुंबईकर मुख्य संपादक श्री प्रमोद सूर्यवंशी उपसंपादक सौ वसुधा नाईक, ग्राफिक्स डिझाईनर श्री अंगद दराडे

प्रमुख पाहुणे पाठ्य पुस्तकातील कवी लघुपट अभिनेते श्री राम घडे, जेष्ठ साहित्यिक अभिनेते अजय बिरारी, फिल्म प्रोड्यशन




सागर देशमुख, सूत्र संचालक श्री शैल सुतार आणि सौ सुचित्रा कुंचंमवार जेष्ठ समाज सेवक डॉ रवींद्र भोळे सर, डॉ ललिता जोगड, डॉ शिवचरण उज्जैनकर,कवयित्री योगिता कोठेकर, पत्रकार भारत कवितके,योगेश हरणे, गौरव पुंडे आदी करून मोठं मोठे कवी, गझलकार आदी करून दिग्गज मंडळी हजर होते.हिंगणकर महाराज यांनी मराठा समाजासाठी व समग्र हिंदू समाजासाठी मोलाचे योगदान आहे तसेच सिद्धबेट बचाव तपोवन हटावं यासाठी ही १९८७ साली लढा दिला होता तसेच आद्यपही इंद्रायणी साठी स्वच्छता अभियान रॅली, उपोषणे करून लढा दिला.आणि साहित्याच्या मधमातून अनेक मंचवरून कवितेच्या, अभंगाच्या मध्यातून जनजागृती केली उपोषणे केली तसेंच वृक्षारोपण कोरोना काळात लोकांना बाहेर फिरू नये यासाठी मोठे जनजागृती करून सामाजिक धैर्य प्रदान केले त्यांची वासुदेव पासस्टी, अभंग निर्झरं भाग १, भाग २ प्रकाशित असून ऑनलाईन अनेक पुस्तके अनेकआहेत तसेच राज्यस्तरीय,राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कवी संमेलणाचे अध्यक्षपद, प्रमुख पाहुणे, उदघाटक, पदेही भूषविले आणि विश्व वारकरी सेना राष्ट्रीय प्रवक्ता,युवा फाउंडेशन माहितीचा अधिकार पोलिसमित्र संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष पदी, हिंदुरक्षक धर्म परिषदेचे पुणे जिल्हाध्यक्ष पद,जय महाकाल संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष पद इंद्रायणी सेवा फाउंडेशन चे कार्याध्यक्ष पद, तसेच अखिल भारतीय वैष्णव कला साहित्य मंच च्या माध्यमातून अनेकविध हजारो साहित्यिक घडवले आहेत. तसेच संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान च्या उपक्रम द्वारे विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणा सोबत अध्यात्मिक ओळख ज्ञानेश्वरीची यां माध्यमातून स्वखर्चाने एक पैसा नं घेता मुलांना आध्यत्मिक जीवन शिक्षण देऊन सुसंस्कृत केले, पर्यवरण रक्षणार्थ अनेज झाडें करण्याचे इंद्रायणी सेवा फौंडेशन च्या मध्यमातून कार्याध्यक्ष म्हणून राबवले असे अणेकं कार्य त्यांच्या हातून झाले अनेक पूरस्कारही त्यांना समाजाच्या माध्यमातून कार्य प्रणाली द्वारे प्राप्त झाले आहेत.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com